


नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

अहिल्यानगर | अंक १७९ | वर्ष ५० वे | रविवार, २० जुलै २०२५ | पाने १२ | किंमत ₹ ६




## ‘स्थानिक स्वराज्य’साठी पवार प्लस पवार?

### पक्षातील आमदारांची मते जाणून घेतल्याची चर्चा

**मुंबई – एकीकडे मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार का, हा प्रश्न चर्चेत असताना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या तोंडावर पवार काका-पुतणे एकत्रितपणे निवडणुकीला सामोरे जाणार का, या प्रश्नाने उचल खाल्ली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका लक्षात घेता अजित पवार व शरद पवार यांचे गट सोबत येण्यासंदर्भात पक्षातील आमदारांशी चर्चा केल्याची माहिती पक्षातील नेत्यांमध्ये दबक्या आवाजात सुरू आहे.**





राज्याच्या राजकारणात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे पडघम वाजू लागले आहेत. त्यामुळे सर्वच पक्ष वेगवेगळ्या पातळीवर चाचपणी करत आहेत. यामध्ये प्रमुख राष्ट्रवादीचे दोन्ही गट, काका-पुतणे जवळ येण्याची चर्चा आहे. जर शरद पवार आणि अजित पवार यांचे दोन्ही गट एकत्र आले तर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत फायदा होईल अशी माहिती काही आमदारांनी अजित पवारांना दिली असल्याचे सांगितले जाते.

छत्रपती संभाजीनगर येथे बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी विलिनीकरणावर भाष्य केले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची कोणतीही चर्चा नाही. पण, विलिनीकरणाचे (पान ६ वर)

## सुनेच्या नावे केलेली जमीन पुन्हा सासू-सासऱ्यांच्या नावे

### उपविभागीय अधिकारी चिंचकर यांचा महत्वपूर्ण आदेश

**श्रीगोंदा (तालुका प्रतिनिधी)**– तालुक्यातील येवती येथील वडिलोपार्जित शेतजमीन सुनेकडून परत वृद्ध दांपत्याच्या नावे करण्याचा महत्त्वाचा आदेश ‘आई-वडिलांचा आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण प्राधिकरण’ चे पीठासीन अधिकारी तसेच श्रीगोंदा-पारनेर उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी दिला आहे. तसेच तहसीलदारांना अभिलेखात नोंद करण्याचे निर्देशही दिले आहेत. या आदेशामुळे आई- वडिलांकडे तसेच ज्येष्ठ नागरिकांकडे त्यांच्या निर्वाहाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना मोठी चपराक बसणार आहे.

समाजात अनेक व्यक्ती वयस्कर आई-वडिलांकडे दुर्लक्ष करतात. वडिलोपार्जित मालमत्ता लग्नानंतर पत्नीच्या नावे करून आई-वडिलांना घराबाहेर काढतात. अशा प्रकरणात न्याय देण्यासाठी प्राधिकरण काम करते. श्रीगोंदा तालुक्यातील येवती येथील ज्ञानदेव दिनकर आढाव आणि त्यांच्या पत्नी अंजनाबाई आढाव या वृद्ध दाम्पत्याने न्यायाधिकरणाकडे केलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, त्यांचा मुलगा (पान ६ वर)

## महत्त्वाचे

### ३ महिला भाविकांचा चंद्रभागेत बुडून मृत्यू

**पंढरपूर** – विठुरायाच्या दर्शनासाठी आलेल्या तीन महिला भाविकांचा चंद्रभागा नदीमध्ये बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना शनिवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास घडली. यातील दोन महिला भाविक जालनामधील आहेत. तर एका महिलेची ओळख पटलेली नाही. जालन्याच्या भोकरदन तालुक्यातील धावडा गावच्या दोन महिला भाविक आणि एक अनोळखी महिला भाविक शनिवारी सकाळी पुंडलिक मंदिराजवळ स्नान करण्यासाठी पाण्यात उतरल्या होत्या. त्यांना पाण्याचा अंदाज आला नसल्याने तिघीही पाण्यात बुडल्या. काही भाविकांच्या लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा केला. या महिलांना वाचवण्याचा प्रयत्नदेखील केला. मात्र, पाण्याचा प्रवाह वेगात असल्याने तिन्हीही महिला बुडाल्या. सुनीता सपकाळ (वय ४३) आणि संगीता सपकाळे (४०) या दोन महिला भोकरदन तालुक्यातील धावडा गावच्या रहिवासी आहे.

### रायगड पायरी मार्ग पर्यटकांसाठी खुला

**रायगड** – पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पूर्णपणे बंद करण्यात आलेला रायगडचा पायरी मार्ग आता केवळ हवामान खात्याचा रेड किंवा ऑरेंज अलर्ट असेल, त्याच दिवशी बंद ठेवला जाणार आहे. काही दिवसांपूर्वी, जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी अतिवृष्टीचा धोका लक्षात घेऊन रायगडचा पायरी मार्ग पर्यटकांसाठी बंद ठेवण्याचे आदेश दिले होते. शनिवारी जिल्हा प्रशासनाने भूमिकेचा फेरविचार करत सुधारित आदेश जारी केला. पूर्वीचे निर्बंध शिथिल केले. नवीन सुधारित निर्णय: केवळ हवामान खात्याने रेड किंवा ऑरेंज अलर्ट जारी केलेल्या दिवशीच पायरी मार्ग बंद राहील. इतर सर्व दिवशी मार्ग पर्यटकांसाठी खुला असेल.

### संगीता बिजलानीचे फार्महाऊस फोडले

**पुणे (प्रतिनिधी)**– बॉलीवूड अभिनेत्री आणि माजी क्रिकेटपटू मोहम्मद अजहरुद्दीन यांची पूर्वाश्रमीची पत्नी अभिनेत्री संगीता बिजलानी यांच्या पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील पवना धरणाच्या बँक वॉटरला असलेल्या तिकोना पेठ येथील फार्महाऊसमध्ये चोरी आणि तोडफोड झाल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी फार्महाऊसमधून रोख ५० हजार रुपये आणि ७ हजार रुपये किंमतीचा एक टीव्ही असा एकूण ५७ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. या प्रकरणी, भारताचे माजी क्रिकेट खेळाडू मोहम्मद अझहर उद्दीन यांचे स्वीय सहाय्यक (पीए) मोहम्मद मुजीब खान (वय ५४, रा. अदिल पॅलेस, जयसिंगपुरा, छत्रपती संभाजीनगर) यांनी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

## पारनेर साखर कारखान्याचा १५० कोटींचा मुद्देमाल गायब

### पंचनाम्यात प्रकार समोर : पेट्रोल पंपही सापडेना

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)– पारनेर साखर कारखाना विक्री गैरव्यवहारातील अंदाजे १५० कोटी रुपयांचा मुद्देमाल आरोपींनी कारखाना साईटवरून गायब केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. पोलिसांच्या पंचनाम्यात हा प्रकार समोर आला असून आता पोलिस या प्रकरणी काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

याबाबत सविस्तर माहिती अशी, पारनेर सहकारी साखर कारखाना विक्री गैरव्यवहार प्रकरणात फिर्यादी असलेल्या कारखाना बचाव समितीने या गुन्ह्यातील मुख्य मुद्देमाल असलेल्या कारखाना मशिनरीचा पंचनामा करण्याची मागणी पोलिसांकडे केली होती. त्यानुसार तपासणी अधिकाऱ्यांनी कारखाना साईटची पाहणी शुक्रवारी सायंकाळी केली आणि पंचनामा केला. यावेळी या ठिकाणची मशिनरी आरोपींनी इतरत्र हलविल्याचे दिसून आले. यातील आरोपींवर पारनेर न्यायालयाच्या आदेशानंतर जानेवारी महिन्यांत गुन्हा दाखल झाला होता.



आरोपींच्या पुनर्विचार याचिकेवर अहिल्यानगर सत्र न्यायालयाने काही काळासाठी स्थगिती दिली होती. २ जुलै रोजी सत्र न्यायालयाने स्थगिती उठवत आरोपींची (पान ६ वर)

## राज्यात लवकरच ॲग्रिस्टॅक आयुक्तालय

### उद्योगांची एकत्रित माहिती एकाच छताखाली

**पुणे** – राज्यात यापुढे शेती आणि शेतीपूरक उद्योगांसाठी योजनांचा लाभ, तसेच कृषीविषयक सल्ला देण्यासाठी आता ॲग्रिस्टॅक आयुक्तालयाची स्थापना करण्यात येणार आहे. यात कृषी, महसूल, वन, उद्योग, समाज कल्याण विभागांच्या योजनांमधील लाभार्थ्यांची एकत्रित माहिती आणि आकडेवारी उपलब्ध राहणार आहे. यासाठी १४ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आकृतिबंधाचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. येत्या दोन महिन्यांत आयुक्तालयाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

दरम्यान, आतापर्यंत राज्यातील १ कोटी १० लाख शेतकऱ्यांनी ॲग्रिस्टॅकमध्ये नोंदणी केली आहे. राज्यातील कृषी क्षेत्रात (पान ६ वर)




#### आयुक्तालयाचा उद्देश

- विविध विभागांकडून जसे वन समाज कल्याण मत्स्य व्यवसाय पशुसंवर्धन उद्योग या विभागांकडून योजनांचा लाभ घेणारे शेती व शेतीपूरक उद्योगांची निगडित शेतकरी भूमिहीन मजूर व उद्योजक यात समाविष्ट असतील. यामुळे राज्यात यानंतर अशा नागरिकांची एकत्रित माहिती एकाच छताखाली उपलब्ध होणार आहे. ॲग्रिस्टॅक योजना ही महाराष्ट्राने देशाला दिली आहे. शेतकऱ्याच्या नावावरील जमीन व तो लाभ घेत असलेल्या योजना याची एकत्रित माहिती यातून कळणार आहे. यासाठी आता स्वतंत्र ॲग्रिस्टॅक आयुक्तालय स्थापन करण्यात येत आहे. केंद्र सरकारने देखील ही संकल्पना देशपातळीवर राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

## मुंबईत ठाकरेच पाहिजे

### जरांगे पाटील : एकत्र यावे ही जनतेची इच्छा

**पुणे(प्रतिनिधी)** – राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले तर मराठा समाजाचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट लोकांना आनंदच होईल. ‘मुंबईत पाहिजे तर ठाकरे पाहिजेत’ ही जुनी म्हण आम्ही लहानपणापासून ऐकल्याचे सांगत लोकांची तीव्र इच्छा आहे की हे दोन्ही भाऊ एकत्र यावेत तर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे, अशी भावनिक हाक मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे. दरम्यान, येत्या २९ ऑगस्ट रोजी मराठा आरक्षणासाठी मुंबईत काढण्यात येणारा



मोर्चा हा मागील मोर्चापेक्षा पाचपट मोठा असेल आणि या लढ्यात कोणत्याही अडथळ्याशिवाय विजय मिळवणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी धनगर समाज आणि मराठा समाज कधीच वेगळे नव्हते आणि नसणार असे सांगितले. धनगर समाजाने मराठा (पान ६ वर)

## घटलेला लाभांश, अहवालात अनावश्यक तरतूदी, कर्मचारी भरती गाजणार

### शिक्षक बँकेची आज सर्वसाधारण सभा

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)– यंदा शिक्षक सभासदांचा घटलेला लाभांश, अहवालात अनावश्यक करण्यात आलेल्या वेगवेगळ्या लाखोंच्या तरतुदी, बँकेने गेल्या महिन्यांत नियुक्त केलेले एमडी (व्यवस्थापक) यासह नव्याने प्रस्तावित केलेल्या भरतीवर शिक्षक बँकेच्या सभेत खडाजंगी चर्चा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या वेळी सत्ताधारी विरोधकांच्या प्रश्नांना कसे तोंड देणार? दरवर्षीची गोंधळाची परंपरा यंदाही कायम राहणार का? याकडे जिल्ह्याचे लक्ष राहणार आहे. दरम्यान, सत्ताधारी गुरूमाऊलीमधील एका गटा विरोधात सर्व विरोधी मंडळांनी विरोधाचा सूर आवळला असून विरोधकांची ही धार कायम राहणार की सत्ताधारी विरोधकांना गळाला लावणार हे सभेनंतर स्पष्ट होणार आहे.**




दरम्यान, आजच्या सभेसमोर येणाऱ्या बँकेचा अहवाल हा गेल्या वेळच्या चेअरमन, व्हाईस चेअरमन यांच्या कार्यकाळातील असून आताचे नूतन पदाधिकारी जुन्या पदाधिकाऱ्यांचे नावाने गेल्या वर्षभरातील कारभाराची पावती फडत त्यांना अडचणीत आणणार की आपला अजेंडा सभे पुढे मांडणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. सभेच्या पार्श्वभूमीवर विरोधी मंडळाकडून सत्ताधाऱ्यांवर करण्यात आलेल्या आरोपात डिसेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत ठेवीवर रामेश्वर चोपडे चेअरमन असताना ठेवीवरचे व्याजदर ८.१० व ८.६० दिले. तर कर्ज वाटपाला बँकेत पैसे नव्हते, म्हणून जवळजवळ २९५ कोटी ठेवी नूतणीकृत, तसेच जमा केल्यामुळे बँकेला २०२४-२५ या आर्थिक वर्षात ठेवींवर व्याज १०३.७१ कोटी व (पान ६ वर)

## गुगल, मेटा यांना समन्स

### ईडीच्या कारवाईने टेक जायंट्स अडचणीत




**नवी दिल्ली** – आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉन्डरिंग प्रकरणांमध्ये अंमलबजावणी संचालनालयाने गुगल आणि मेटा या जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांना समन्स पाठवत २१ जुलै रोजी चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. या कंपन्यांवर बेकायदेशीर बेटिंग ॲप्सचा प्रचार केल्याचा आरोप आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून विविध ऑनलाइन बेटिंग ॲप्सच्या जाळ्याचा तपास करत आहे. या ॲप्सना कौशल्याधारित गेम्स असल्याचा बनाव करून प्रत्यक्षात जुगारासाठी वापरले जात होते. या प्लॅटफॉर्म्सवरून हजारो कोटींचा काळा पैसा निर्माण झाल्याचा संशय असून, तो हवाला मार्गाने परदेशात (पान ६ वर)

## अकरावीच्या प्रवेशाची तिसरी नियमित फेरी जाहीर

### २६ जुलैला निवड यादी होणार प्रसिध्द

**पुणे** – इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतील तिसरी नियमित फेरी जाहीर करण्यात आली आहे. या प्रवेश फेरीअंतर्गत विद्यार्थ्यांना नाव नोंदणी करून अर्जाचा भाग एक भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. तर, विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी महाविद्यालयांचा पसंतीक्रम नोंदवीत अर्जाचा भाग दोन भरण्याची प्रक्रिया येत्या मंगळवारपासून (दि. २२) सुरू होणार आहे. या फेरीतील निवड यादी २६ जुलै रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

राज्यातील ९ हजार ४८३ कनिष्ठ महाविद्यालयांमधील २१ लाख ३७ हजार ५५०



जागांकरिता केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अकरावीच्या प्रवेशासाठी एकूण १४ लाख ११ हजार ९१९ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. या प्रक्रियेअंतर्गत सध्या दुसऱ्या नियमित फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांची महाविद्यालयात प्रत्यक्ष जाऊन प्रवेश निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. याप्रमाणे, राज्यातील जवळपास एक लाख ६६ हजार ७५५ विद्यार्थ्यांनी शनिवारपर्यंत कनिष्ठ महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश निश्चित केला आहे. दरम्यान, दुसऱ्या फेरीत प्रवेशासाठी महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना येत्या सोमवारपर्यंत (दि. २१) प्रवेश घेता येणार आहेत. एकीकडे कॅपअंतर्गत प्रवेशाची प्रक्रिया सुरू असतानाच, दुसरीकडे विविध कोट्याअंतर्गत प्रवेशाची प्रक्रिया सुरू असणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक (पान ६ वर)

## धनुष्यबाण चिन्ह दुसऱ्याला द्यायचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही

**मुंबई – निवडणूक आयोग धोंड्या असून त्या धोंड्याला शेंदूर फासला तरी धनुष्यबाण चिन्ह दुसऱ्याला द्यायचा अधिकार नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. पक्षाच्या मुखपत्रासाठी ठाकरे यांनी खासदार संजय राऊत यांना दिलेल्या मुलाखतीत त्यांनी अनेक मुद्यांवर भाष्य केले असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही घणाघाती टीका केली आहे.**

### उध्दव ठाकरे यांची टीका



शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात याचिकेवर सुनावणी अद्याप झालेली नाही. सर्वोच्च न्यायालयाने उद्धव ठाकरेंना ऑगस्टमध्ये सुनावणीची तारीख देऊ असं म्हणत दिलासा दिला होता. त्यामुळे या सुनावणीत काय होणार याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलंय. त्यातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अधिवेशन सुरू असताना दिल्ली दौऱ्यावर गेले होते. यावरून आता उद्धव ठाकरे यांनी मोठं विधान केलंय. राऊतांनी विचारलं की, मुख्यमंत्री पदासाठी ड्युप्लिकेट शिवसेना भाजपमध्ये विलीन करायला निघालेत त्याकडे तुम्ही कसं पाहता. यावर उद्धव ठाकरेंनी म्हटलं की, त्यांच्याकडे दुसरा काय पर्याय आहेत? गुरुपौर्णिमेच्या दिवशी त्यांनी जे केलं त्याचं वर्णन तुम्हीच केलंय. दिल्लीत जाऊन किती पाय धुवायचे आणि चाटायचे? असे जे लोक असतात ते परावलंबीच असतात. निवडणूक आयोग आणि अमित शहांनी जी शिवसेना दुसऱ्यांच्या हाती दिलीय ती भाजपमध्ये कशी विलीन करू शकतात? हा शिवसेनेचं अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न आहे का? असे प्रश्न विचारले असता उद्धव ठाकरे म्हणाले की, अस्तित्व संपवायचा प्रयत्न असला तरी ते संपवू शकत नाहीत. इतक्या वर्षांनंतरही ते जनतेला माझ्यापासून तोडू शकत नाहीत. म्हणूनच घालीन लोटांगण वंदीन चरण (पान ६ वर)